ठाणे जिल्ह्याचे लोकप्रिय वृत्तपत्र

# ठाणे वार्ता

बातमी तीच, जी सत्य असेल!

र्ष : १५ वे ■ अंक क्र. ३२५ ■ शुक्रवार, दि. ६ सप्टेंबर २०२४ ■ पृष्ठे : ४ ■ किंमत : २ रुपया ■ ई-मेल : thanevarta2010@gr

## बिर्ला कॉलेजच्या वतीने वृक्ष दिंडी द्वारे जनजागृती

**कल्याण, दि. ५ :** बि. के. बिर्ला महाविद्यालय कल्याण, राष्ट्रीय वृक्ष मित्र मंडळ कल्याण शाखा, केडीएमसी आणि सेन्चुरी रेयॉन यांच्या संयुक्त विद्यमाने 'वृक्ष दिंडी'चे आयोजन करण्यात आले. हि वृक्ष दिंडी इंदिरा नगर - संतोषी माता रोड - सहजानंद चौक - शिवाजी चौक - केडीएमसी अशी काढण्यात आली. या उपक्रमात कल्याण नगरीतील ८ शाळा आणि २० महाविद्यालयातील सुमारे १६०० विद्यार्थी ज्यात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व इतर विद्यार्थी सहभागी झाले होते.



या उपक्रमाची सुरुवात १९९१ पासून कै. रामभाऊ कापसे, कै. सीताराम पै, कै. जे. के. पाठारे आणि डॉ. नरेश चंद्र निर्देशक (बि. के. बिर्ला महाविद्यालय) यांच्या संकल्पनेतून आकारास आली. कल्याण शहरात सुरु झालेलं शहरीकरण आणि निसर्ग याचा समतोल घडवून आणण्यासाठी आणि नागरिकांनी निसर्गाचं उत्तमरित्या संगोपन करण्यासाठी हि वृक्ष दिंडी आयोजन गेली ३३ वर्षे कल्याण शहरात अविरत सुरु आहे. या वृक्ष दिंडीत प्रमुख पाहुणे म्हणून घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त अतुल पाटील, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव, एस. एस. देशमुख उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बिर्ला महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. सर्व विद्यार्थी वर्गाने निसर्ग संवर्धन, झाडांची लागवड व त्यांची काळजी, नैसर्गिक उत्पत्ती या प्रकारचे संदेश देणारे फलक तयार केले होते. या फलकांमुळे विशेष अशी जनजागृती करण्यात साहाय्य झाले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकश चितलांगे, उपाध्यक्ष सुबोध दवे, बि. के. बिर्ला महाविद्यालयाचे निर्देशक डॉ. नरेश चंद्र, प्राचार्य डॉ. अविनाश पाटील, डॉ. वाडेकर, प्राचार्य, रात्र महाविद्यालय, डॉ. महादेव यादव उप प्राचार्य, डॉ. हरीश दुबे उप प्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले. ह्या वृक्ष दिंडीचे संयोजन डॉ. संदेश जायभाए यांनी केले.

## बिड़ला कॉलेज ने किया पौधारोपण

### वृक्षारोपण के माध्यम से कल्याण में जनजागृति

■ **कल्याण,** (सं). बी. के. बिड़ला कॉलेज कल्याण, राष्ट्रीय वृक्ष मित्र मंडल कल्याण शाखा, केडीएमसी और सेंचुरी रेयॉन ने संयुक्त रूप से 'वृक्ष दिंडी' का आयोजन किया. इस पेड़ दिंडी को इंदिरा नगर - संतोषी माता रोड - सहजानंद चौक - शिवाजी चौक - केडीएमसी से होकर निकाला गया. इस कार्यक्रम में कल्याण शहर के 8 स्कूलों और 20 कॉलेजों के लगभग 1600 छात्रों सहित राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना और अन्य छात्रों ने भाग लिया.



**प्राकृतिक से संबंधित संदेश वाली तख्तियां :** यह गतिविधि 1991 से शुरू हुई. रामभाऊ कापसे, स्व. सीताराम पई, स्व. जे.के. पठारे और डॉ. नरेश चंद्र निदेशक (बी.के. बिड़ला कॉलेज) द्वारा परिकल्पित कल्याण शहर में शहरीकरण और प्रकृति को संतुलित करने और नागरिकों को प्रकृति की सबसे अच्छे तरीके से देखभाल करने के लिए, कल्याण शहर में 33 वर्षों से लगातार इस वृक्षारोपण का आयोजन किया जा रहा है. इस अवसर पर केडीएमसी के ठोस अपशिष्ट प्रबंधन उपायुक्त अतुल पाटिल, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव, एस. एस. देशमुख उपस्थित थे. सभी छात्रों ने प्राकृतिक उत्पत्ति पर संदेशों वाली तख्तियां तैयार की थीं. कार्यक्रम में संस्था के अध्यक्ष ओमप्रकाश चितलांगे, सुबोध दवे, डा. नरेश चंद्रा, प्राचार्य डॉ. अविनाश पाटिल, डॉ. वाडेकर, प्राचार्य, डॉ. महादेव यादव उप प्राचार्य, उप प्राचार्य डॉ. हरीश दुबे के मार्गदर्शन में इस पेड़ के तने का संयोजन डॉ. संदेश जयभाई ने दिया था.